Jagdamba Education Society's
SND POLYTECHNIC
KNOWLEDGE PERSPECTIVE UNDERSTNING

Jagdamba Education Society's

# Santosh N. Darade Polytechnic

At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

Accredited by
NATIONAL BOARD OF ACCREDITATION

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

Date: 03/11/2025

## Activity Name: Day Special


## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

आपल्या वाचकांच्या, आठवणींच्या...
आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

# दिनविशेष



## बुद्धिप्रामाण्यवादी अर्थशास्त्रज्ञ अमर्त्य सेन

अमर्त्य सेन हे जागतिक कीर्तीचे मानवतावादी, बुद्धिप्रामाण्यवादी भारतीय अर्थशास्त्रज्ञ, भारतरत्न आणि अर्थशास्त्रातील नोबेल पुरस्काराचे मानकरी आहेत. कल्याणकारी अर्थशास्त्र, सामाजिक निवडीचा सिद्धांत, तसेच दारिद्र्याच्या प्रश्नावर केलेल्या संशोधनाबद्दल त्यांना १९९८ मध्ये अर्थशास्त्रातला नोबेल पुरस्कार देण्यात आला. सेन यांचे कल्याणकारी अर्थशास्त्रातील मूलभूत समस्यांवरील योगदान अतिशय महत्त्वाचे आहे. त्यात सामाजिक निवडीचा सिद्धांत, दारिद्र्याचे निर्देशांक, कल्याणाचे निर्देशांक आणि दुष्काळाचे विश्लेषण या गोष्टींचा समावेश आहे. सेन यांचा जन्म शांतीनिकेतन येथे एका सुशिक्षित आणि सुसंस्कृत कुटुंबात आशुतोष व अमिता या दाम्पत्यापोटी ३ नोव्हेंबर १९३३ रोजी झाला. त्यांचे वडील आशुतोष हे डाक्का विद्यापीठात रसायनशास्त्राचे प्राध्यापक होते.

सेन यांनी डाक्का येथील सेंट ग्रेगरी स्कूलमध्ये सुरुवातीचे शिक्षण घेऊन पुढे विश्वभारतीत इंटरपर्यंतचे शिक्षण घेतले आणि १९५३ मध्ये कोलकात्याच्या प्रेसिडेन्सी कॉलेजमधून अर्थशास्त्र हा विषय घेऊन ते बी. ए. झाले. नंतर ते पुढील शिक्षणासाठी इंग्लंडला गेले. १९५५ मध्ये ट्रिनिटी कॉलेज, केंब्रिजमधून त्यांनी दुसऱ्यांदा अर्थशास्त्र विषयात बी. ए. ही पदवी मिळविली. त्यानंतर त्यांनी तेथूनच १९५९ मध्ये एम. ए. आणि त्याच वर्षी पीएच. डी. या पदव्या संपादित केल्या. १९५५-१९५८ या काळात त्यांनी जादवपूर विद्यापीठ व १९६३-१९७१ या काळात दिल्ली स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स येथे अध्यापन केले. नंतर १९७१-७७ या काळात त्यांनी इंग्लंडमधील लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स आणि १९७७ -१९८८ या काळात ऑक्सफर्ड विद्यापीठ येथे अध्यापन केले. त्यांनी १९८८-१९९८ या काळात अमेरिकेतील हार्व्हर्ड विद्यापीठात अर्थशास्त्र आणि तत्त्वज्ञान या विषयांचे अध्यापन केले. त्यांनी १९९० मध्ये देशांची क्रमवारी ठरविण्यासाठी तेथील लोकांचे आयुर्मान, शिक्षण व उत्पन्न यांवर आधारित 'युनायटेड नेशन्स ह्यूमन इंडेक्स' ही प्रणाली विकसित केली.

Nashik Edition

Nov 03, 2025 Page No. 4

Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

Jagdamba Education Society's
SND POLYTECHNIC
KNOWLEDGE PERSPECTIVE UNDERSTNING

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401